# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०६ एप्रिल, २०१७ / चैत्र १६, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### ठाणे आणि भिवंडी येथे अन्न व औषध प्रशासनाने औषधांचा साठा जप्त केल्याबाबत

**(१) * ७९११० श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील राजश्री ट्रेडर्स यांच्याकडील १० लाख रुपये किंमतीचा आयुर्वेदिक औषधांचा साठा अन्न व औषधे प्रशासन विभागाने दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास जप्त केला व भिवंडी येथील कांचन फार्मा येथून ६ लाख रुपये किंमतीचा बनावट औषधांचा साठा माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईसह ठाणे, नाशिक, बुलढाणा या ठिकाणी अन्न व औषध प्रशासन विभागाने दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास बनावट सौंदर्य प्रसाधने व औषध साठा जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आलेले आहे व त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) पेढ्यांच्या तपासणीदरम्यान आढळून आलेल्या नियमांच्या उल्लंघनाप्रकरणी उत्पादकांना तसेच जाहिरातदारांना अन्न व औषध प्रशासनाव्दारे कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांची उत्तरे अप्राप्त आहेत. उत्तरे प्राप्त होताच प्रशासनाकडून नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. वेळीच कारवाई घेण्यात आल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलचे तीन वर्षात वार्षिक लेखा परिक्षण झाले नसल्याबाबत

**(२) * ८२२१६ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलाचे सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या तीन वर्षाचे वार्षिक लेखापरिक्षण झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संकुलात वर्षभर विविध संघटना, संस्थांकडून घेण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय, विभागीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांद्वारे स्टेडीयमला लाखो रुपयांचे भाडे प्राप्त होत असतानाही याबाबत क्रीडा उपसंचालकांनी आर्थिक ताळेबंदबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी पत्राद्वारे खुलासा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीच्या जा.क्र. ८१८/११७९/२०१६-१७ दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती विचारली असता क्रीडा

संकुलाकडून पत्राची दखल घेण्यात आली नसून शासकीय अधिकाऱ्यांकडूनच नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलाचे वार्षिक लेखापरिक्षण करण्यास दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

शिवछत्रपती क्रीडापीठासाठी (क्रीडा संकुल) सनदी लेखापाल (C.A.) करारतत्वावर नियुक्त करण्यास उच्चस्तरीय धोरण समितीच्या दि.२७.७.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे यांचे वार्षिक लेखापरिक्षण करण्याकरीता भारताचे नियंत्रक-महालेखापरीक्षक कार्यालय, दिल्ली यांचेकडून पुणे येथील नोंदणीकृत असलेल्या सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर सनदी लेखापाल यांना क्रीडा पीठामार्फत सन २००८-०९ ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यांचेमार्फत लेखापरिक्षणाबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर लेखापरिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन २०१४-१५ पासून पुढील आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाची कार्यवाही करण्यात येईल.

(२) होय.

शिवछत्रपती क्रीडापीठाचा (क्रीडा संकुल) सन २००८-०९ ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे ताळेबंद अंतिम करण्याची कार्यवाही सुरु असल्याने सद्यस्थितीमध्ये आर्थिक ताळेबंद उपलब्ध करुन देता येत नाही. असे दि.४.३.१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.३१ डिसेंबर,२०१६ रोजीच्या पत्राद्वारे विचारणा केलेली माहिती प्राचार्य क्रीडा प्रबोधिनी, पुणे यांनी दि.४.३.२०१७ अन्वये दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## बुट्टीबोरी (जि. नागपूर) येथील इंडोरामा पॉवरप्लांट व शिल्पा रोलिंग मिलमुळे होणारे प्रदुषण

**(३) * ७३९३५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुट्टीबोरी (जि. नागपूर) येथील एमआयडीसीतील इंडोरामा, मोरारजी पॉवरप्लांटची राख विनापरवाना अवैधरित्या वटेघाट परिसरातील जंगलात टाकत असल्याचे व सदर राखेमुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी नापिक झाल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर एमआयडीसीतील शिल्पा रोलिंग मिल व इंडोरामा कंपनीचे रासायनिक पाणी व स्पेन्ट अ‍ॅसिड थेट वेणा नदीत सोडण्यात येत असल्याने नदीकाठच्या गावातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपन्यांचे रासायनिक पाणी वेणानदीत सोडत असल्याची बाब दिनांक १४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे तसेच नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी दिनांक ३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष दिलेल्या भेटीत सदर बाब निदर्शनास येऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत व शेतकऱ्यांच्या जमीनींचे नुकसान रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, मे. शिल्पा स्टिल अँड पॉवर लि. या कंपनीस दिनांक ०८.१२.२०१६ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले होते.

दिनांक १७.१२.२०१६ रोजी उद्योगाचा विद्यूत पुरवठा खंडीत करण्यात आला. उद्योगाची रुपये दहा लक्ष बँक हमी जप्त करण्यात आली असून रुपये वीस लक्ष बँक हमी जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

इंडोरामा सिन्थेटिक्स (इं) लि. या कंपनीस दिनांक २७.११.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली असून दिनांक २९.११.२०१६ रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साकोली (जि.भंडारा) तसेच विदर्भातील अनेक जिल्हयात हमीभाव धानखरेदी केंद्राअंतर्गत खरेदी केलेले धान मिल मालक उचलत नसल्याबाबत**

**(४) * ७४१९४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तसेच विदर्भातील अनेक जिल्हयात शासनातर्फे हमीभाव धानखरेदी केंद्राअंतर्गत सुरु असलेली धान खरेदी मोठया प्रमाणात होत असल्याने व त्या खरेदी केलेल्या धानाचे मिलिंग करण्याकरीता मिल मालकांशी जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या करारानुसार कोणतीच तडजोड झाली नसल्याने मिल मालक धान उचलत नसल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान ठेवण्याकरीता यापूर्वी खाजगी गोदामे भाडयाने घेतली जात होती, परंतु फेडरेशनने भाडे न दिल्यामुळे गत अनेक वर्षापासून भाडे थकीत असल्याने खाजगी गोदामे धान ठेवण्याकरीता उपलब्ध होत नाहीत तसेच फेडरेशनच्या म्हणण्याप्रमाणे फक्त दोन ते तीन महिने धान गोदामात ठेवावे लागते व तेवढेच भाडे गोदाम मालकांना देण्यात यावे मात्र प्रत्यक्षात ८ ते १० महिने धान गोदामात पडून रहात असल्यामुळे सर्व महिन्यांचे भाडे मिळण्याची मागणी गोदाम मालकांची असल्याने यामध्ये निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल धान उघडयावर पडून खराब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने धान्य उचलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

हंगाम २०१६-१७ मध्ये भंडारा जिल्हयात खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या भरडाईसाठी ६३ मिलर्सची नेमणूक करण्यात आली असून ६१ मिलर्स भरडाईचे नियमित काम करीत आहेत व विदर्भातील इतर जिल्हयात ५९ राईस मिलर्सबरोबर करारनामे करण्यात आले असून भरडाईचे काम नियमित सुरु आहे.

(२) साकोली तालुक्यात ९ खरेदी केंद्रांवर १७७४४४.७ क्विंटल धान खरेदी झालेली असून त्यापैकी ५९२९४ क्विं. धानाची साठवणूक १२ गोदामात करण्यात आली आहे. आदिवासी विकास महामंडळ हे आदिवासी उपयोजन क्षेत्रात संवेदनशील भागात किमान आधारभूत किंमत खरेदीयोजनेंतर्गत धानाची खरेदी करते. महामंडळाच्या कार्यक्षेत्रात जंगल व दुर्गम भाग असल्यामुळे तेथे खाजगी व शासकीय गोदामे उपलब्ध नाहीत. परंतू शेतक-यांना आधारभूत किंमतीचा लाभ देण्याच्या दृष्टीने गोदामाअभावी धान उघडयावरच साठवावे लागते. केंद्र शासनाकडून राज्य शासनास रु.२.४० प्रति क्विंटल प्रमाणे फक्त दोन महिन्यांसाठी गोदामभाडे मंजूर होते. त्यामुळे प्रत्यक्ष साठवणूक केलेल्या कालावधीचे गोदामभाडे अदा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

धान खरेदीचा कालावधी हा सुमारे ८ महिन्यांचा असतो. त्यानंतर धान भरडाई व त्यास होणारा विलंब यामुळे हे धान बराच काळ साठवणूक करावे लागते. प्रत्यक्ष कालावधीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरानुसार गोदाम भाडे मिळावे अशी गोदाम मालकांची मागणी आहे. सदर गोदाम मालकांची मागणी विचारात घेऊन प्रलंबित गोदाम भाडयाची रक्कम संबंधितांना अदा करण्याविषयी प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे. पणन महासंघामार्फत खरेदी केलेले धान हे उघडयावर साठवणूक करण्यात आलेले नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारे धान खराब झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानवत (जि.परभणी) तालुक्यातील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने वितरित केलेल्या शिधापत्रिका गहाळ झाल्याबाबत

**(५) * ७९३०१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने दीड वर्षापूर्वी दिलेल्या नव्या शिधापत्रिकांपैकी २ हजार ५४७ शिधापत्रिका गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गहाळ शिधापत्रिकांचा शोध लागत नसल्याने जवळपास ४ लाख ५१ हजार रूपयांचे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुसार सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) तहसिल कार्यालय, मानवत येथील शिधापत्रिका वाटपाच्या अभिलेखाची जिल्हा पुरवठा निरीक्षण अधिकारी,परभणी व जिल्हा लेखा पर्यवेक्षक, परभणी यांच्याकडून निरीक्षण करण्यात आले असून दोन्ही अहवालात तफावत आढळून आली आहे.

जिल्हा पुरवठा निरीक्षण अधिकारी,परभणी यांच्या प्रथम दर्शनी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित नायब तहसिलदार व अव्वल कारकून यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, उपरोक्त दोन्ही अहवालात तफावत आढळल्याने या बाबत फेर चौकशीकरिता जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हास्तरीय पथक नेमले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जांभरूण-सागवन (ता. जि. बुलढाणा) येथील स्वस्त धान्य दुकान वाटपात झालेला गैरप्रकार

**(६) * ८३११५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांभरूण-सागवन (ता. जि. बुलढाणा) येथे नव्याने मंजूर करण्यात आलेल्या स्वस्त धान्य दुकानाच्या निवड प्रक्रियेत अपंग, महिला बचत गट यांना प्राधान्य असतांनासुध्दा त्यांना डावलुन गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक महिला बचत गटांनी माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याकरिता व सदर निवड प्रक्रिया रद्द करणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) दि.२६.१०.२०१६ रोजी स्थानिक बचत गटांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार नोंदविलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१०.५.२०१० च्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने रास्तभाव दुकान मंजूर करताना स्वयंसहायता गट (महिला/पुरुष) यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी , आर्या रोजगार व स्वयंरोजगार, सेवा सहकारी संस्था मर्यादित यांची निवड केली आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी फेरतपासणी करून नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## उत्तमनगर (ता. चोपडा,जि. जळगांव) येथील आदिवासी कुटुंबातील तिघांचा दूषित पाण्यामुळे झालेला मृत्यू

**(७) * ८३६९१ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तमनगर (ता. चोपडा,जि. जळगांव ) येथील आदिवासी कुटुंबातील तिघांचा दूषित पाण्यामुळे दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील पाणी दूषित होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) व (३) उत्तमनगर या चोपडा तालुक्यातील वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करुन वसलेला पाडा कोणत्याही ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट नाही. तथापि, त्या ठिकाणी ३ हातपंप व १ टयुबवेल आहे. त्यापैकी, २ हातपंप व टयुबवेलचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याने बंद केले असून, सद्यस्थितीत १ हातपंप पिण्याचे पाण्याकरीता सुरु आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सिमेस लागुन असलेल्या मध्यप्रदेश राज्यातून उत्तमनगर या पाडयावर आदिवासी कुटूंब आले होते व सदर पाडयापासून २-३ कि.मी. अंतरावरील नवाड भागात वास्तव्यास होते. त्या भागातून वाहत असलेल्या नाल्यातील/ डबक्यातील दुषीत पाणी प्याल्याने कुटुंबातील माता व २ बालके यांचा अतिसाराची लागण झाल्याने मृत्यू झालेला आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच मयत व्यक्तीच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोटेगाव व सत्तरधरवाडी (जि.लातूर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतींची झालेली दुरवस्था

**(८) * ८४४९७ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद लातूर अंतर्गत प्राथमिक शाळा मोटेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) व प्राथमिक शाळा सत्तरधरवाडी (ता.औसा, जि.लातूर) या शाळेच्या इमारतीची दुरावस्था झाली असून गळके छत, भिंती कमकुवत व धोकादायक झाल्यामुळे सदर शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकाप्रतिनिधिनी मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे वर्ग मागील अनेक वर्षापासून वरांड्यात वा इतर ठिकाणी भरवले जात असून, याबाबत ग्रामपंचायत सत्तरधरवाडी व मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद लातूर, गट शिक्षणाधिकारी, औसा यांच्याकडे शाळांच्या खोली बांधकाम व दुरुस्तीबाबत सतत निवेदनाद्वारे मागणी करूनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोटेगाव व सत्तरधरवाडी येथील प्राथमिक शाळांच्या नवीन इमारतींचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

मोटेगाव येथील ४ वर्गखोल्या व सत्तरधरवाडी येथील ३ वर्गखोल्या मोडकळीस आल्याने सदर दोन्ही ठिकाणी नवीन वर्गखोल्यांची बांधकामे सुरू करण्यात आली आहेत. मोटेगाव येथील ४ वर्ग शाळेच्या मैदानात पत्र्याच्या शेडमध्ये व सत्तरधरवाडी येथील ३ वर्ग गावातील आश्रमशाळेत भरविण्यात येतात.

(३) मोटेगाव व सत्तरधरवाडी येथील प्राथमिक शाळांच्या वर्गखोल्यांचे बांधकाम सुरू करण्यात आले असून पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्याचे प्रयोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिंगारा (ता. जळगाव जामोद,जि.बुलढाणा) येथील शासकीय वसतिगृहात सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(९) * ७७८८८ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिंगारा (ता. जळगाव जामोद, जि.बुलढाणा) येथील आदिवासी बहूल भागात असलेल्या शासकीय वसतिगृहात गेल्या अनेक दिवसांपासून विद्‌यार्थ्यांना सोयी सुविधांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वसतिगृहात विद्‌यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसून विद्‌यार्थी संख्येच्या तुलनेत अंथरुण-पांघरुणही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) विहिरीवरुन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून त्याकरिता डिझेल इंजिन बसविण्यात येत आहे तसेच अंथरुण- पांघरुण उपलब्ध करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील केबल ऑपरेटर सेटटॉप बॉक्सची जास्त दराने विक्री करून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याबाबत

**(१) * ७८५९३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात केबल ग्राहकांकडून बाजारात ५०० रुपयांना मिळणारे सेटटॉप बॉक्स १८०० ते २५०० रुपयांना विकून किमान ४० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करून ग्राहकांची फसवणूक करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाकडील दिनांक ३१ जानेवारी, २००१ च्या परिपत्रकानुसार केबल ऑपरेटर जोडणीधारकाकडून घेत असलेल्या कोणत्याही स्वरूपातील पैशाची त्याने ग्राहकांना पावती देणे बंधनकारक असल्याबाबतचे परिपत्रक जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याची बाब माहिती अधिकारात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही, हे खरे नाही.

अशा प्रकारची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान रायगड जिल्ह्यात व वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या निदर्शनास आलेली नाही अथवा या यंत्रणेकडे अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच रायगड यांच्याकडे सेट टॉपबॉक्सच्या तक्रारीबाबत एकही प्रकरण दाखल झालेले नाही.

(२) सेट टॉप बॉक्सचा पुरवठा करणे व बसविणे याबाबत केबल टेलिव्हिजन नेटवर्क (सुधारणा) नियम, २०१२ मध्ये सेट टॉप बॉक्सच्या आकारण्याच्या रकमेबाबत तरतूद नसल्याने सेट टॉप बॉक्स बसविण्यासाठी ग्राहकांकडून किती पैसे घ्यावेत तसेच ग्राहकांना पावती द्यावी अगर कसे याबाबत शासनाकडील कोणत्याही सूचना/परिपत्रक कार्यालयाकडे नसल्याबाबतची माहिती अर्जदारास दिली आहे.

(३) केबल टेलिव्हिजन नेटवर्क (सुधारणा) नियम, २०१२ अन्वये केबल जोडणी धारक थेट बहुविध यंत्रणा परिचालक यांच्याकडून किंवा स्थानिक केबल ऑपरेटर यांच्यामार्फत सेटटॉप बॉक्स विकत घेण्यासाठी संपर्क साधू शकतो. परंतु केबल जोडणीधारकास मंजूर गुणवत्ता असलेला सेटटॉप बॉक्स खुल्या बाजारात उपलब्ध असल्यास खुल्या बाजारातून खरेदी करण्यास मुभा देण्यात आलेली आहे आणि मल्टिसिस्टिम किंवा केबल ऑपरेटर कोणत्याही ग्राहकाला सेटटॉप बॉक्स त्यांच्याकडून विकत घेण्याबाबत किंवा भाड्याने घेण्याबाबत सक्ती करु शकत नाही अशी तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) येथील कातकरी कुटुंबे रास्त धान्यापासून वंचित असल्याबाबत**

**(११) * ८१४८७ श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील २८२ कुटुंबे रास्त भाव धान्यापासून वंचित असल्याची लेखी तक्रार शुर झलकारी कातकरी महासंघ यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुरवठा अधिकारी, डहाणू यांच्याकडे दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त २८२ कुटुंबांना रास्त भाव धान्यसाठा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे तवा व निंबापूर, ता.डहाणू येथील आदिम जमात कातकरी कुटुंबाच्या २४ शिधापत्रिकाधारकांना अंत्योदय अन्न योजनेचे धान्य मिळत नसल्याबाबत सदर संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर २४ कुटुंबांना शिबीर आयोजित करुन अंत्योदय अन्न योजनेच्या विभक्त शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत. सदर २४ शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या मूळ एकत्रित कुटुंबांच्या नावे असलेल्या शिधापत्रिकांवर कुटुंबाचे एकत्रित धान्य मिळत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) जिल्हा परिषदेच्या**
**२५२ पैकी ५१ शाळांमध्ये संगणक नसल्याबाबत**

**(१२) * ७५१७५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या पनवेल तालुक्यातील २५२ शाळांपैकी ५१ शाळांमध्ये संगणक नसून ७३ शाळांमधील ११५ हून अधिक ठिकाणी संगणक नादुरूस्त असून विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाची माहिती व्हावी यासाठी केंद्र व राज्य शासन कोट्यावधी रूपये खर्च करीत असताना जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांचे याबाबत दुर्लक्ष होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे

काही संगणक जुन्या प्रणालीचे झाल्याने त्यांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च अधिक असल्याने बंद आहेत. परंतु लोक वर्गणीतून संगणक संच तसेच सेस अनुदानातून / ग्राम पंचायतीमार्फत ई-लर्निंग संच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(२) व (३) शिक्षकांचे MSCIT प्रशिक्षण पूर्ण झाले असल्याने शिक्षक विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यास समर्थ आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## कुदळवाडी-मोशी (पिंपरी-पुणे) परिसरात रसायनमिश्रित पाणी इंद्रायणी नदीत सोडल्यामुळे होणारे वायू व जल प्रदूषत

**(१३) * ७८०८० अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुदळवाडी-मोशी परिसरात (पिंपरी-पुणे) रसायनमिश्रित आणि प्लॅस्टिक कचरा जाळण्यात येत असून रसायनमिश्रित पाणी इंद्रायणी नदीत सोडले जात असल्याने हवा व पाण्याचे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने इंद्रायणी नदी प्रदूषित करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे केलेल्या चौकशीत आढळून आले आहे की सदर परिसरामध्ये सांडपाणी निर्माण करणाऱ्या मोठया, मध्यम व लहान उद्योगांकडे स्वत:च्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा असून प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा पुनर्वापर उद्योग प्रक्रियेत व बागबगीच्यासाठी केला जातो. कोणत्याही उद्योगातुन विनाप्रक्रीया सांडपाण्याचा विसर्ग नदीमध्ये केला जात नाही.

तसेच मंडळातर्फे अप्रक्रीयाकृत सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याकरीता मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा उभारण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला समजपत्र, प्रस्थावित आदेश (समजपत्र दि.१८/११/२०१५, व दि.२१/०६/२०१६ तसेच आदेश दि.१९/०६/२०१५ व ०६/०५/२०१६ )बजावण्यात आले आहेत. तसेच मनपा विरुध्द जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये फौजदारी खटला आर.सी.सी. नं. १४४/२००० व आर.सी.सी. नं. ७०९/२०१६ मा. मुख्य दंडाधिकारी पुणे यांच्या न्यायालयात दाखल केला आहे व तो न्याय प्रविष्ट आहे.

तथापि, चिखली, कुदळवाडी व मोशी परिसरातील भंगार व स्क्रॅप व्यावसायिक अनधिकृतपणे व्यवसाय चालू ठेवून परिसरामध्ये अनधिकृतपणे भंगार व कच्चा माल उघडयावर जाळत आहेत. अशा सर्व भंगार व्यावसायिकांवर कारवाई करून हे उद्योग बंद करावेत आणि परिपूर्ण भूयारी गटार योजना करून त्या परिसरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी अशा सुचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ममदापूर (ता.तिवसा, जि.अमरावती) पाईपलाईन लिकेज असल्यामुळे नागरीकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१४) * ८३२३३ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ममदापूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे काही वर्षापूर्वी टाकण्यात आलेल्या पाईपलाईनला अनेक ठिकाणी व थेट गटारात गळती असल्यामुळे दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाईपलाईन लिकेजची प्रशासनाकडे तक्रार करुनही अद्यापपर्यंत पाईपलाईनच्या दुरुस्तीबाबत कोणतीच दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त पाईपलाईन तातडीने दुरुस्त करण्याबाबत व नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, पाण्यामुळे कुठलाही आजारी रुग्ण आढळून आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ७/१/२०१७ रोजी प्रत्यक्ष मौका पाहणी केली. त्यावेळी, व्हॉल्व्ह लिकेज व पिण्याच्या पाण्याचे टाकीजवळ पाईप लाईन लिकेज झाल्याचे आढळून आले.

पर्यायी व्यवस्था म्हणून दरम्यानच्या काळात ३ हातपंपाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा करण्यात आला. ग्रामपंचायतीमार्फत सदर ठिकाणी व्हॉल्व बदलून नविन व्हॉल्व उंचावर घेण्यात आले, तसेच पाईपलाईन दुरुस्तीचे काम तातडीने करण्यात आले असून गावात सुरळीत पाणी पुरवठा चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवठाणा खांब व राजुरा (ता.मालेगांव,जि.वाशिम) येथे मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांना मान्यता देण्याबाबत

**(१५) * ८२१२७ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवठाणा खांब व राजुरा (ता.मालेगांव,जि.वाशिम) ही गांवे टंचाईग्रस्त गांवात मोडत असुन दरवर्षी उक्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवठाणा खांब व राजुरा येथे मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांना प्राधान्यतेने मान्यता देण्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्यस्थिती काय आहे

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. मौजे देवठाण खांब गावास सन २०१५-१६ च्या टंचाई कालावधीत टँकरने व विहीर अधिग्रहण करुन पाणीपुरवठा करण्यात आला आहे. तसेच सन २०१६-१७ च्या पाणी टंचाई कृती आराखड्यात सदर गावास ०१ टँकर प्रस्तावित करण्यात आला आहे. मौजे राजुरा गावास सन २०१५-१६ च्या टंचाई कालावधीत गावात उपलब्ध असलेले हातपंप व

सार्वजनिक विहिरी याद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला असून टँकर अथवा विहीर अधिग्रहण करुन पाणीपुरवठा करण्याची निकड भासली नाही. मात्र सन २०१६-१७ च्या पाणी टंचाई कृती आराखड्यात सदर गावास ०१ टँकर प्रस्तावित करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या योजना व त्याकरिता आवश्यक निधीची तरतूद या विभागाच्या दि.०७ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली असून त्यामध्ये मौ. देवठाणा खांब व राजुरा या गावांचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाची एखादी योजना काही कारणास्तव रद्द झाल्यास अन्य योजना घेण्याचे अधिकार मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीस आहेत. मात्र सद्य:स्थितीत कोणतीही योजना रद्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे मौजे देवठाणा खांब व राजुरा (ता. मालेगांव, जि. वाशिम) नळ पाणीपुरवठा योजनांची कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदरूख (ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्प अनियमिततेप्रकरणी कारवाई करण्याबाबत**

**(१६) * ८४००० श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २१९ मधील प्रश्न क्रमांक ६४३१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरूख (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्प अनियमितते प्रकरणी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी दिलेल्या जाहीर आश्वासनानुसार सदर प्रकल्पाचे तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश अध्यक्ष, ग्रा.पा.पु.व स्व.समिती, नांदरूख व प्रशासक, नांदरूख यांना जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या अनुक्रमे दिनांक ०४ मे, २०१६ आणि दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात येवूनही आजमितीपर्यंत त्यांनी निर्देशाचे पालन केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी माहे जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सदर प्रकल्पास मार्गदर्शन करणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांवरदेखील कारवाई करण्याचे जाहीर आश्वासन देवूनही आजतागायत (तब्बल १९ महिने लोटूनही) त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प, सिंधुदुर्ग आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा, सिंधुदुर्ग यांच्या विशेष लेखा परीक्षा अहवालात सदर प्रकल्पाचे अभिलेखे मिळत नसल्याचे नमूद असल्याने शासकीय कागदपत्रे गहाळ झाली असतानाही त्यासाठी जबाबदार असलेल्यांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार कारवाई करण्यात, तसेच स्थानिक निधी लेखा परीक्षा, सिंधुदुर्ग यांच्या दिनांक ३१ऑक्टोबर,२०१५ रोजीच्या अहवालात विशेष लेखा परीक्षा अहवालात सदरहू प्रकल्पाच्या कामांची लाखो रुपयांची वसुलपात्र रक्कम वसूल करण्यात जि. प., सिंधुदुर्ग मधील संबधित अधिकाऱ्यांनी आजतागायत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन निर्देशाचे पालन न करणाऱ्या अध्यक्ष, ग्रा.पा.पु. व स्व. समिती आणि प्रशासक नांदरूख, तसेच सदर प्रकरणी विहित मुदतीत शासनाच्या आश्वासनांची पूर्ती करण्यात हेतुपुरस्कर दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) दि. ४ मे, २०१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१६ व दि. ३१ डिसेंबर, २०१६ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी तांत्रिक सेवा पुरवठादारांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग देवगड यांना गुन्हा दाखल करण्याबाबत फेर आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार तांत्रिक सेवा पुरवठादारांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) जलस्वराज्य प्रकल्पात कार्यरत असलेल्या तत्कालिन अधिकाऱ्यांचे खुलासे मागविण्यात आले असून, सदर प्राप्त खुलाशांची छाननी करुन जिल्हा परिषद, सिंधुदूर्गमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

प्रकल्पाचे अभिलेखे हे गहाळ झालेले नाही. स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालात नमुद केलेली वसूलपात्र रकमेबाबत ग्रामपंचायत नांदरुखमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) नांदरुख ग्रामपंचायत बरखास्त करण्यात आली असून प्रशासकाची नियूक्ती केलेली आहे. तांत्रिक सेवा पुरवठादारावर गुन्हा दाखल करण्यास प्रशासक यांनी दिरंगाई केल्याने त्यांचेवर कारवाई करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालवण यांना दि. १७ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी कळविले असून सदर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दादर, मुंबई येथील मॉडर्न इंग्लिश स्कुल या संस्थेने अवाजवी फी वाढ केल्याबाबत

**(१७) * ७७९०० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर पूर्व येथील मॉडर्न इंग्लिश स्कुल, इंडियन एज्युकेशन या संस्थेने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ राजपत्र असाधारण भाग चार, दिनांक २१ मार्च, २०१४ मधील कलम ४ (३) चे उल्लंघन करून सन २०१६-१७ या वर्षात अवाजवी फी वाढ करून पालकांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचेकडे प्रसाद तुळसकर यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या वार्षिक अहवालानुसार संस्था कोटयावधी रूपये नफ्यात असल्यांचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संबधित शाळेच्या पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ अंतर्गत गठीत केलेल्या विभागीय शुल्क नियामक समिती, मुंबई कडे तक्रार दाखल केली असून त्यावर समितीमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खरसुंडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील कारखाने दुषित पाणी कालव्यात सोडत असल्याने होणारे प्रदूषण**

**(१८) * ७९५९४ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरसुंडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथून पाताळगंगा नदीचे पाणी कालव्यात सोडण्यात येते परंतु याच मार्गावरील लहानमोठे कारखाने रात्रीच्या वेळी रसायनमिश्रित दूषित पाणी टँकरद्वारे कालव्यात सोडण्यात येत असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच पाण्याचा रंग लाल होत असल्याने गुरे आजारी पडली आहेत, उक्त तालुक्यातून वाहणाऱ्या पंचगंगा नदीवरील खरसुंडी नजिकच्या बंधाऱ्यातील पाणी ज्या कालव्यातून देण्यात येते त्या कालव्यात रसायनमिश्रीत सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी तहसिलदार श्री.चव्हाण यांना दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पाताळगंगा (ता.पनवेल व खालापूर,जि.रायगड) या नदीचे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत शुध्दीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,त्यानुषंगाने उक्त कारखाने व संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त नद्या प्रदूषणमुक्त करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) सदर बाबत दिनांक १८/०१/२०१७ रोजी तहसिलदार, खालापूर यांच्याकडे तक्रार प्राप्त. तथापि, कार्यकारी अभियंता रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी कालव्यात दूषित पाणी सोडल्याचे दिसून आले नसल्याचे पाहणी अहवालानुसार कळविलेले आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी, खालापूर यांनी या परिसरातील शेतकऱ्यांच्या जनावरांना दूषित पाण्यामुळे आजारी असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याचे आणि दूषित पाण्यामुळे जनावरांवर गेल्या १ वर्षापासून कोणताही औषधोपचार केला नसल्याचे कळविलेले आहे.

(३) ग्राम विकास व जलसंधारण विभागाने सदर निवेदन प्राप्त नसल्याचे कळविले आहे.

(४)

- रायगड पाटबंधारे विभागाने कोकण हंगाम सन २०१६-१७ साठी दि.०३/०१/२०१७ रोजी कालव्यातून पाणी सोडण्यात आले तेव्हा पाहणी केली असता कालव्यात दूषित पाणी आढळले नाही.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन पहाणी केली जाते व उद्योगानी संमती पत्रातील अटींचे उल्लंघन केल्यास वा नैसर्गिक स्त्रोत खराब केल्याचे निदर्शनास आल्यास जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ अ अन्वये उद्योगांवर वा संबंधितांवर कारवाई करण्यात येते.
- उपरोक्तनूसार संमतीपत्रातील अटीशर्तींचे अनुपालन न केल्यामुळे मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि., खरसुंडी यांना दिनांक ०६/०३/२०१७ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्याबाबत

**(१९) * ७८८४८ अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २३२ मधील प्रश्न क्रमांक ५९४५५ ला**

**दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत सन २०१६-२०१७ करीता वार्षिक कृती आराखड्यानुसार ६५ गावे/वाड्यांना पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उद्दिष्टांनुसार शासनाने आजतागायत किती गावे/वाड्यांच्या पाणी पुरवठा योजना पूर्ण केल्या आहेत व उर्वरित गावे / वाड्यांना किती कालावधीत पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे,

(३) तसेच केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यातील अनेक गावांमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेची काही कामे निधी अभावी व सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याने अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) बीड जिल्हयातील फेब्रुवारी अखेर ४४ गावे/वाडयांचा पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. मार्च, २०१७ अखेर १५ गावे/वाडयांचा पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन असून, उर्वरित योजना सन २०१७-१८ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत गावाच्या मागणी नुसार नळ पाणी पुरवठा योजना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत राबविण्यात येत आहे. निधी उपलब्ध असूनही पाणी पुरवठा समितीकडून कामे पुर्ण करण्यास होणारी दिरंगाई, पाणी पुरवठा समिती व ग्रामपंचायतीतील वाद इत्यादी कारणामुळे योजना रखडतात. ज्या गावामध्ये योजनांची कामे अद्याप अपुर्ण आहेत, अशा गावांना अस्तित्वातील तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना, विंधन विहिरी, सार्वजनिक विहिरी इत्यादी उपाययोजनाव्दारे पाणी पुरवठा होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सावर्डे भुवडवाडी, कुंभारवाडी, गुरववाडी, व पिंपळ मोहल्ला (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) हद्दीत कात इंडस्ट्रीजमधून होत असलेल्या प्रदूषणाबाबत

**(२०) * ८४६५६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावर्डे भुवडवाडी, कुंभारवाडी, गुरववाडी, व पिंपळ मोहल्ला (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) हद्दीत सुरु असलेल्या कात इंडस्ट्रीज मधून रसायनयुक्त सांडपाणी लगतच्या कापशी नदीत सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रसायनयुक्त सांडपाणी नदी प्रवाहात सोडण्यात येत असल्याने सदर नदीतील पाणी तसेच लगतच्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दुषित होत असून त्याचा मानवी तसेच प्राणी आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांनी संबधीत ग्राम पंचायतीकडे तक्रार करूनही दुर्लक्ष होत असल्यामुळे त्यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.पर्यावरण मंत्री, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन देउन योग्य ती कारवाई करणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरचे प्रदूषण रोखणे व संबंधितांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मा. पर्यावरण मंत्री, यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १५/१२/२०१६ रोजी सदर ठिकाणी पाहणी करून नदीचे तसेच नदीलगत असलेल्या विहीरीच्या पाण्याचे नमुने संकलित केले. पृथ्थकरण अहवालावरून नदीच्या व विहीरीच्या पाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेत आढळून आली. तथापि, कारखान्यातील काताचे पाणी नदीमध्ये जाऊ न देण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण)

कायदा, १९७४ च्या अनुषंगाने कारवाई करुन संबंधित कारखान्यास दिनांक १६/२/२०१७ रोजी अंतरिम आदेश दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरगाव (जि.रत्नागिरी) पाणी योजनेतील अपहाराबाबत उपअभियंता, शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी करण्याबाबत**

**(२१) * ८०४५४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगाव (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील नळपाणी योजनेमधील अनियमिततेप्रकरणी निलंबित करण्यात आलेले उपअभियंता, शाखा अभियंता यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागीय चौकशी प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक दस्तऐवजाची मागणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारा जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडे करण्यात आली असून आवश्यक दस्तऐवज प्राप्त झाला आहे काय,
(३) तसेच, उक्त नळपाणी पूरवठा योजनेमध्ये रूपये वीस लाखांचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसचे कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) विभागीय चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून मागणी केलेला आवश्यक परिपूर्ण दस्तऐवज अद्याप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त झालेला नाही.

(३) होय.

(४) व (५)

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केलेल्या अहवालानुसार, विभागीय चौकशीच्या अनुषंगाने आवश्यक परिपूर्ण दस्तऐवज जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचेकडून प्राप्त झाल्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येईल.

सद्यस्थितीत संबंधीत शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता तसेच ग्राम स्तरावरील तीन समित्या यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यात आली असून शाखा अभियंता व उप अभियंता यांना निलंबीत करण्यात आलेले आहे.

-----------------

**विधान भवन** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.